नियमीत फौ. ख.क्र. ९१/२०२१
सरकार विरुध्द परशुराम वगैरे
निशाणी क्र. १३१

## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र (०९) यांची जबानी.

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांवः– संजय माणिकराव दराडे
वय सुमारेः– ५४ वर्ष, व्यवसायः–सराफ व्यवसाय
निवासस्थानः– पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर

## सर तपासणी

**अभियोग पक्षाकरिता श्रीमती. ए. बी. कुलकर्णी, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.**

फिर्यादी मुकुंद चिंतामणी याला मी व्यवसायिक संबंधातून ओळखतो. घटना दि. १४.०१.२०११ रोजी घडली होती. त्या दिवशी फिर्यादीने पोलिस स्टेशनला चार सोन्याच्या टिकल्या हजर केल्या होत्या. त्या दिवशी पोलिस निरीक्षक त्या टिकल्या घेवून माझेकडे आले होते. त्याचे वजन केले असता चार टिकल्यांचे एकुण वजन १० ग्रॅम १० मिली भरले होते. त्या टिकल्या तपासल्या असता मला त्या सोन्याच्या आढळल्याने मी प्रमाणपत्र तयार केले. आता मला दाखविण्यात आलेले प्रमाणपत्राची छायांकित प्रत ही तीच आहे. त्यावर माझी सही आहे. **प्रमाणपत्राच्या छायांकित प्रतीस आर्टीकल अ देण्यात** येते.

सरतपास पुर्ण.

## उलट तपासणी आरोपीकरिता श्री. जे टी. बट्टुळे वकील

२. आर्टीकल अ यावरती दुकान परवाना क्रमांक नमुद नाही. पोलिस निरीक्षक यांनी आणलेल्या सोन्याच्या टिकल्या त्यांनी कोठून आणल्या याची मला कल्पना नाही. फिर्यादीसोबत माझे घरगुती संबंध आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला मदत होणेकरीता प्रमाणपत्रातील मजकूर खोटा नमुद करुन खोटी साक्ष देत आहे.

...उलटतपास पुर्ण.

... फेर तपास ... काही नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत.

दिनांकः १४.१०.२०२५.

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2025.10.14 17:18:15 +0530

**(रविकिरण सपाटे )**
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
पाथर्डी जि. अहमदनगर.